# सायबर सुरक्षेबाबत शारदानगरला कार्यशाळा

**माळेगाव, ता. ७ :** ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट (बारामती), क्विक हिल फाउंडेशन (पुणे) व महाराष्ट्र पोलिस सायबर सेल यांच्या वतीने शारदानगर येथे 'सायबर सेफ्टी आणि सायबर सिक्युरिटी अवेअरनेस' यावर आयोजित कार्यशाळेस विद्यार्थिनींचा प्रतिसाद मिळाला.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र पोलिस सायबर सेलचे राहुल किर्वे, अतुल डेरे व क्विक हिल फाउंडेशनच्या प्रतिनिधी सुगंधा दाणी उपस्थित होते. दरम्यान, राहुल किर्वे यांनी सायबर गुन्हे, सायबर सुरक्षिततेची गरज, सायबर गुन्ह्यांचे प्रकार, सायबर गुन्ह्यांचे कलमे, फिशिंग, सायबर ग्रुमिंग, सायबर डिफेमेशन (बदनामी), सायबर स्टोकिंग याची माहिती दिली. क्विक हिल फाउंडेशनच्या प्रतिनिधी सुगंधा दाणी यांनी सायबर युग, दैनंदिन जीवनात



**शारदानगर (ता. बारामती) : सायबर सिक्युरिटी अवेरनेस कार्यशाळेत मार्गदर्शन करताना क्विक हिल फाउंडेशनच्या प्रतिनिधी सुगंधा दाणी.**

येणारा इंटरनेटशी संबंध अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. विशेषतः यापुढील काळात क्विक हिल फाउंडेशन व शारदाबाई पवार महिला महाविद्यालय यांच्यात झालेल्या करारानुसार बीसीए विभागाच्या विद्यार्थिनी पुणे ग्रामीण विभागातील विविध शाळा; तसेच महाविद्यालयांमध्ये जाऊन तेथील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सेफ्टी व सायबर सिक्युरिटी यावर जनजागृती करणार आहेत, अशी माहिती प्राचार्य रा. बा. देशमुख यांनी दिली. कार्यक्रमास बीसीए विभागाचे प्रमुख प्रा. ए. यू. फाळके, उपप्राचार्य प्रा. ए. एस. कदम उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. एम. एल. गवारे यांनी मानले.



**राज्य सरकारची 'सायबर सेफ विमेन' ही योजना ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून सुरू झालेली आहे. या योजनेअंतर्गत महिलांची सायबर गुन्ह्यामध्ये फसवणूक झाली, तर सरकारच्या वतीने महिलांना मदत दिली जाणार आहे.**

– **सुगंधा दाणी**, प्रतिनिधी,
क्विक हिल फाउंडेशन